शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार आवश्यक शिक्षकीय पदे निर्माण करणेबाबत..

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१४/प्र.क्र.७३/१४/तांशि-५,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २१ डिसेंबर, २०१७

संदर्भ :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.टिईडी-२००९/(२१२/०९)/ तांशि-५, दिनांक ०८/०७/२००९.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.मान्यता-२०१४/प्र.क्र.५२/तांशि-५, दिनांक ६ जून, २०१४.

३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.९(३)/नियोजन/पदनिर्मिती/गोंदिया/२०१४/२३८, दिनांक १३/०६/२०१४ रोजीचे पत्र.

४) वित्त विभाग उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनाक २६ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.६५/१७/आ.पु.क., दि.०७/११/२०१७.

प्रस्तावना :-

शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेमध्ये सन २०१४-१५ पासून विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी असे २ नवीन पदविका अभ्यासक्रम प्रत्येकी ६० प्रवेश क्षमतेने सुरू करण्यात आलेले आहेत. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषानुसार शासकीय तंत्रनिकतन, गोंदिया येथे नव्याने २१ शिक्षकीय पदे सुरू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने सदर संस्थेमध्ये २१ शिक्षकीय पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेने मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीसमोर ठेवण्यात आला. त्यास अनुसरून उच्च स्तरीय सचिव समितीने शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथे २१ शिक्षकीय पदे नियमित स्वरुपात निर्माण करण्यास दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या क्र.४/२०१७ व्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. उक्त बाबींचा सर्वागिण विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक २६/१०/२०१७ रोजीचे बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेमध्ये पुढीलप्रमाणे २१ शिक्षकीय पदे भरण्याबाबत याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रु.)	मंजूर करण्यात आलेल्या पदांची संख्या
१	विभागप्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	०१
२	विभागप्रमुख, उपयोजित यंत्रशास्त्र	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	०१
३	विभागप्रमुख, विद्युत अभियांत्रिकी	३७४०० - ६७०००, ग्रे.पे.९०००	०१
४	अधिव्याख्याता, स्थापत्य अभियांत्रिकी	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०६
५	अधिव्याख्याता, विद्युत अभियांत्रिकी	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०७
६	अधिव्याख्याता, यंत्र अभियांत्रिकी	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०१
७	अधिव्याख्याता, पदार्थ विज्ञान	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०१
८	अधिव्याख्याता, गणित	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०१
९	अधिव्याख्याता, उपयोजित यंत्रशास्त्र	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०१
१०	अधिव्याख्याता, अणुविद्युत व दुरसंचरण अभियांत्रिकी	१५६०० - ३९१००, ग्रे.पे. ५०००	०१
		एकूण	२१

२. वर नमूद पदांपैकी अ.क्र. १,२ व ३ येथील पदांच्या निर्मितीकरीता मंत्रीमंडळाची मान्यता स्वतंत्ररित्या घेण्यात येत आहे. ती प्राप्त झाल्यानंतर ती पदे निर्माण झाल्याचे समजण्यात येईल.

३. सदरचे पदनिर्मितीकरीता आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुद पुढील विधीमंडळाच्या अधिवेशनात विहित मार्गाने करण्यात येईल याचे अधिन राहून पदनिर्मितीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. ही पूरक मागणी मंजूर झाल्याखेरीज या पदांवरील खर्च करण्यात येवू नये.

४. हे आदेश वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.४१३/आपुक, दिनांक ९/८/२०१७ आणि दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या क्र.४/२०१७ व्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtgra.govt.in या सकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२२११२५०००७२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2017.12.21 12:57:24 +05'30'

(अ. र. काटकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर,
३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर / मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
५. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
८. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया,
९. वित्त विभाग, व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि-३,७, मंत्रालय, मुंबई,
११. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-५.